शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०४/२०२४

| | | |
|---|---|---|
| श्री.जाधव कृष्णत उत्तम<br>मु.पो.सैदापूर, ता.कराड, जि.सातारा | } | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | | |
|---|---|---|
| १. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, के.एन.गुजर मेमोरिअल हॉस्पिटल, शनिवार पेठ, एस.टी.स्टॅण्ड जवळ, कराड, जि. सातारा.<br>२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. | } | वि.प. |

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि. इन्सि. डॉ दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.जाधव कृष्णत उत्तम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१८/०५/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी वरील नमूद महाविद्यालयात दि.०२/०१/२०१४ पासून आजपर्यंत सलगपणे बेसिक सायन्स ॲण्ड हयुमॅनिटी डिपार्टमेंटमध्ये सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे व माझी निवड विद्यापीठ निवड समितीमार्फत झाली आहे. नेमणूकीपासून मी महाविद्यालय प्रशासनाने दिलेल्या लेखी परीक्षांच्या ज्युनिअर सुपरवायझर आणि इंटरनल सिनीअर सुपरवायझर म्हणून विद्यापीठ परीक्षांचे कामकाज प्रामाणिकपणे पार पाडले आहे. परंतु महाविद्यालय प्रशासनाने सदर परीक्षा कामकाजाचे मानधन आजरोजी पर्यंत माझ्या बँक खात्यात जमा केलेले नाही. तरी मी आपणास विनंती करतो १. सन २०१४ पासून विद्यापीठ परीक्षांचे मानधनाचे ताळेबंद मला देण्याचे आदेश व्हावेत. २. सदर परीक्षांच्या माझ्या कामाकाजाचे मानधन खात्यात जमा करण्याचे आदेश महाविद्यालयास व्हावेत. ३. विद्यापीठ परीक्षांचे काम करणा-या प्राध्यापकांचे मानधन न देणा-या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र व क्लस्टर हेड रद्द करणेत यावे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

परीक्षेचे मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा केले आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

तक्रारी ही परीक्षा मानधन न मिळाल्यासंबधी आहे.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने विद्यापीठाने महाविद्यालयामार्फत घेतलेल्या लेखी परीक्षेत ज्युनिअर सुपरवायझर आणि इंटरनल सिनिअर सुपरवायझर असे काम करून देखील सदर परीक्षा कामकाजाचे मानधन त्यास दिलेले नाही याबाबत आहे. तक्रार सुनावणीस घेतली असता महाविद्यालयातर्फे या समितीपुढे दि.०८/०७/२०२४ चे पत्र दाखल करून त्यात तक्रारदाराचे परीक्षा मानधन माहे मे, २०१९ व मे, २०२२ चे रक्कम रू.२०४०/- हे तक्रारदारांच्या खात्यात दि.०३/०६/२०२४ रोजी जमा केलेली आहे असे म्हणणे मांडलेले आहे. सदरचे मानधन यांच्या खात्यात जमा झालेले आहे ही बाब तक्रारदाराने समितीसमोर मान्य केलेली असून, तथापि या शिवाय देखील इतर कालावधीकरिता त्यांनी सुपरवायझर म्हणून परीक्षेत कामकाज केलेले असून त्याचे मानधन त्यांना अद्याप मिळालेले नाही असे म्हणणे मांडलेले आहे.

तक्रारीसोबत तक्रारदाराने त्यांचे नियुक्ती आदेश, कन्फरमेशन आदेश, चेंजिस इन स्टाफ मान्यता, तक्रार निवारण समितीची फी पावती, परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना पाठविलेला दि.२९/०५/२०२३ रोजीचा ईमेल, परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना पाठविलेला दि.०९/०३/२०२४ रोजीचा ईमेल, तक्रारदार यांना त्या कालावधीकरिता इंटरनल सिनिअर सुपरवायझर म्हणून काम करणेकरिता दि.२५/०७/२०२२ रोजीचे पत्र, महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रा.श्री. आर. ए. खराडे यांना मे, २०२२ करिता दिलेले इंटरनल सिनिअर सुपरवायझर नेमणुकीचे पत्र तसेच दि. १२/०४/२०२१ रोजीचे प्राचार्य यांनी अन्य दोन प्राध्यापक यांना विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सन २०२०-२०२१ करिता समन्वयक म्हणून नेमणूक केल्याचा कार्यालयीन आदेश जोडला आहे.

महाविद्यालयाने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दि.२०/०५/२०२४ रोजीच्या पत्राने तक्रारदार यांना लेखी परीक्षेच्या ज्युनिअर सुपवायझर व सिनिअर सुपरवायझर या कामाचा तपशील देण्यास कळविलेचे दिसून येते व तसे न केल्यास महाविद्यालयाकडे जे रेकॉर्ड आहे त्यानुसार त्यांचे खातेवर बिलाची रक्कम जमा करणेत येईल अशा आशयाचे पत्र दिले आहे. त्यासोबत माहे मे २०१९ व ऑगस्ट २०२२ या दिवसांचे परीक्षेचे कामकाज केल्याबाबतचा तपशील जोडला आहे. सोबत तक्रारदार

यांना त्या कालावधीकरिता इंटरनल सिनिअर सुपरवायझर म्हणून काम करणेकरिता दि. २५/०७/२०२२ रोजीचे पत्र जोडले आहे. सोबत ऑगस्ट २०२०, ऑक्टोबर २०२०, डिसेंबर २०२०, फेब्रुवारी २०२१ या महिन्यांचे पगारपत्रके (पे शीट) जोडले आहेत. दि. १५/०५/२०१९ रोजी ज्युनिअर सुपरवायझर म्हणून केलेल्या परीक्षा कामाचा अहवाल जोडला आहे. तसेच तक्रारदार यांचे नावे आयसीआयसीआय बँक, शाखा कराड येथील संस्था महाविद्यालयाने काढलेला रू. २,०५,०८३/- रक्कमेचा धनादेशाची झेरॉक्स प्रत दिसून येते. त्या प्रतिवर सॅलरी रू. २,०३,०४३/- व परीक्षा बिल रू. २,०४०/- एकूण रू. २,०५,०८३/- लिहिल्याचे दिसून येते.

दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेता, तक्रारदार व संस्था महाविद्यालयाने परीक्षा कामकाजाचा विस्तृत तपशील जोडलेला नाही. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार सन २०१४ पासून विद्यापीठ परीक्षांच्या मानधनाचे ताळेबंद देण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे. परंतु तक्रारदाराने त्याच्या पुष्ठयार्थ सन २०१४ पासून त्यास महाविद्यालयाने परीक्षा कामकाजाबाबत नियुक्ती/कार्यालयीन आदेश दाखल केलेले नाहीत. महाविद्यालयाने त्यांच्या म्हणण्यामध्ये मे, २०१९ व मे, २०२२ परीक्षेचे मानधन जमा केल्याचे समितीसमोर मान्य केले. तथापि तक्रारदाराने इतर परीक्षांचे कामकाज केल्याबाबत पुरावा दाखल केल्यास त्यानुसार महाविद्यालय पडताळणी करून त्या परीक्षांचे मानधन अदा करेल असे समितीसमोर तोंडी मांडले आहे. त्याकरिता समितीने तक्रारदारांना सदरची बाब शाबित करण्याकरिता त्यांचेजवळ काही अभिलेख/पुरावा आहे का असल्यास तो या समितीपुढे आणणेकरिता मुदत देण्यात आली. प्रयत्न करूनदेखील तक्रारदारांना त्यांचा वैयक्तिक सुपरवायझर या कामाबाबतचा अभिलेख/पुरावा मिळालेला नसून त्यांना एकूण महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बाबतचा अभिलेख मिळालेला आहे आणि तो समितीसमोर दाखल केला आहे. सबब उपरोक्त कारणास्तव तक्रारदाराच्या तक्रारीनुसार सन २०१४ पासून विद्यापीठ परीक्षांचे तक्रारदार यांच्या मानधनाचे ताळेबंद या समितीसमोर सादर झालेले नाही.

तक्रारदारांना उपरोक्त दोन महिन्यांच्या शिवाय इतर कालावधीमध्ये परीक्षेत सुपरवायझर म्हणून काम करण्याबाबत पुरावा या समितीसमोर आणता आलेला नाही. परंतु माहे मे, २०१९ व मे, २०२२ चे मानधन त्यांना मिळालेले आहे ही बाब त्यांनी स्पष्टपणे समितीसमोर मान्य केली असल्याने त्याव्यतिरिक्त इतर परिक्षांच्या कामकाजाचे मानधन देणेबाबत विनापुरावा आदेश करणे या समितीस उचित होणार नाही असे या समितीचे मत आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीमधील मुद्दा क्र. ३ मध्ये विद्यापीठ परीक्षांचे काम करणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन न देणाऱ्या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र व क्लस्टर हेड रद्द करणेत यावे अशी मागणी केली आहे. तथापि महाविद्यालयातील परीक्षा केंद्र व क्लस्टर हेड याबाबतचे निर्णय विद्यापीठ प्रशासनाच्या अखत्यारितील बाब असून त्याबाबत आदेश करणे या समितीस उचित होणार नाही. परीक्षा कामकाजामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य हे प्रमुख असतात. विद्यापीठाच्या निर्देशानुसार शिक्षकांच्या परीक्षा कामकाजासाठी घेतलेली रक्कम संबंधित शिक्षकाला देणे ही महाविद्यालयाचे प्राचार्यांची सर्वस्वी जबाबदारी आहे. सबब महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा कामकाजामधील शिक्षकांना त्या त्या वेळेस त्याचे मानधन अदा करणे प्राचार्यांना बंधनकारक आहे.

सबब समिती या निष्कर्षास येते की, उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता सदरची तक्रार निकाली काढणेस पात्र आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रारदाराच्या तक्रार अर्जातील मागणीमधील मे, २०१९ व मे, २०२२ मधील परीक्षा कामकाजाचे मानधन मिळाले असल्याने तक्रारीचे निवारण झाले असल्याने व इतर मागण्या मान्य करता येत नसल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबंधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 04 SEP 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)